
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालयात जल पे चर्चा कार्यक्रम दि.२ मार्च २०२३




भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालयात जल पे चर्चा कार्यक्रम दि.२ मार्च २०२३

← गडचिरोली 4.pdf

# एटापल्लीत रंगली 'जल पे चर्चा'

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**एटापल्ली :** येथील भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्या वतीने महाविद्यालयीन युवकांसोबत 'जल पे चर्चा' विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे जी. एस. हिचामी यांनी कृषी योजनांची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे तसेच कृषीविषयक समस्यांचे निराकरण केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. बुटे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. एस. टी. भगत, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप मैंद, प्रा. डॉ. एस. पी पाटील, प्रा. डॉ. व्ही. ए. दरेकर, प्रा. ढबाले, प्रा. सोनकांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. नीलेश दुर्गे यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. श्रुती गुब्बावार यांनी केले.

कार्यक्रम अधिकारी
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय
एटापल्ली ता.एटापल्ली जि.गडचिरोली

दिनांक ४ मार्च २०२३ पेपर :—दैनिक लोकमत